Your complimentary use period has ended. Thank you for using PDF Complete.
Click Here to upgrade to Unlimited Pages and Expanded Features

**Rate Fixation of Bed and Cushion**
**शासकीय कार्यालयांना लागणा-या**
**''गादी व उशी '' या बाबीसाठी दरनिश्चिती.**

# महाराष्ट्र शासन

**उद्योग संचालनालय,**

**नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई- ४०० ०३२.**

**परिपत्रक क्रमांक उसं/भांखसं/दर निश्चिती/गादी व उशा/२४/**

**२००८-२००९/बी- २७१६१ दिनांक:- ०७/०७/२००८**

**वाचा :-**

1. **शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखसं/१०८८/२५१२/उद्योग-६, दिनांक ०२/०१/१९९२.**
2. **पूरक शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखस/२००३/(३०१९)/ उद्योग-६, दि.१२/०२/२००४**
3. **मध्यवर्ती भांडार खरेदी समिती निर्णय क्र. १३४, दि.१३/०६/२००८.**

शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखस/१०८८/२५१२/उद्योग-६, दि.०२/०१/१९९२ च्या परिशिष्ट पाचमध्ये शासनाचे अंगीकृत व्यवसायांकडून खरेदी करण्यासाठी आरक्षित केलेल्या विविध वस्तूंची यादी देण्यात आली आहे. याच शासन निर्णयातील परिच्छेद ७ नुसार संबंधित संस्थांकडून पुरवठा करण्यात येणा-या वस्तूंची किंमत ठरविण्याचे अधिकार मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या, भांडार खरेदी समितीकडे सोपविण्यात आले आहेत. तसेच परिशिष्ट पाच (क) क्र. २४ मध्ये शासकीय कार्यालयांना लागणारे हातमागाचे कापड व वस्तु महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित, नागपूर यांचेकरीता आरक्षित करण्यात आले आहे. तसेच **पूरक शासन निर्णय क्र. भां.ख.स./२००३/(३०१९)/ उद्योग-६, दि.१२/०२/२००४** अन्वये **''गादी व उशी''** या बाबींसाठी **महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित, नागपूर व महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, फोर्ट मुंबई** यांना आरक्षण देण्यात आलेले आहे.

मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेने महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित, नागपूर व महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, फोर्ट, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावावर समितीने विचार करुन खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे दरनिश्चिती केली आहे.

**''गादी व उशी '' यांचे दर दिनांक ३०/०६/२००९ पर्यंत ग्राहय राहतील. ते एफ.ओ.आर. डेस्टीनेशन सर्व कर समाविष्टीत आहे व जकातकर सवलत प्रमाणपत्र खरेदी विभागाने देणे आवश्यक आहे. जर खरेदी विभाग अशी प्रमाणपत्रे देऊ शकत नसेल तर खरेदीदारास ते कर भरणे आवश्यक राहील.**

PDF Complete
Your complimentary use period has ended. Thank you for using PDF Complete.
Click Here to upgrade to Unlimited Pages and Expanded Features

**ांनी त्यांचेकडे नोंदणीकृत उत्पादक संस्था/सभासद व**
**ा वस्तूंचे शासकीय कार्यालयांना पुरवठा करावा व**
**नास पुरवठा करु नये.''**

**व उशी'' या बाबीसाठी खालील प्रमाणे दरनिश्चित करण्यात आली आहे.**

| अ. क्र. | साहित्याचे नाव | | | सन २००८-२००९ चे निश्चित केलेले दर रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | २. | | | ३. |
| १. | गादी:- | १. | १२ किलो (३''× ३'×६') | ७६४.०० |
| | | २. | १० किलो (३''× ३'×६') | ६५५.०० |
| | | ३. | ८ किलो (३''× ३'×६') | ५४६.०० |
| २. | उशी : १३'' X २२'' | | | ६५.०० |
| ३. | उशी कव्हर : १५'' X २४'' | | | २१.०० |

**पुरवठा कालावधी** - मागणीपत्र मिळाल्यापासून **६** आठवडयाच्या आत मालाचा पुरवठा करणे आवश्यक आहे.

**देय रक्कमेबाबतच्या अटी** :- मागणीकाराला माल प्राप्त झाल्यानंतर **९०**% रक्कम २ आठवडयामध्ये द्यावयाची आहे व उर्वरित **१०**% रक्कम सर्व मालाची मागणीकाराला पोच सुस्थितीत व विनिर्देश प्रमाणे झाल्यानंतर ३० दिवसापर्यंत करणे आवश्यक आहे. पुरवठा कालावधीमध्ये मालाचा पुरवठा न झाल्यास उशीरा पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीवर ½ % प्रती आठवडा प्रमाणे दंड मागणीकारामार्फत आकारला जाईल व त्याची कमाल मर्यादा खालीलप्रमाणे असेल.

(अ) पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत एक लाखापेक्षा कमी असेल तर अशा किंमतीच्या **१०** % दंड.

(ब) पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत एक लाखापेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या **५**% दंड

खरेदीदार कार्यालयीन मालाची पुरवठापूर्व तपासणी महामंडळाच्या खर्चानी करुन घ्यावी.
सदरील दंडाची वसूली करण्यांची संपूर्ण जबाबदारी मागणीकाराची असेल.

**(बी. व्ही. राठोड)**
**उद्योग सह संचालक ( भां.ख.)**
**विकास आयुक्त (उद्योग) यांचेकरिता.**

प्रति,

१) महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित, एम.एस.एच.सी. कॉम्प्लेक्स, उमरेड रोड, नागपूर-४४० ०९९.
२) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट, मुंबइ-४०० ००१.